MHAU090021392018

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | २३.०८.२०१८ |
| नोंदणी दिनांक | २३.०८.२०१८ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०३.०८.२०२६ |
| कालावधी | ०७व. ११म. ११दि. |

**<u>निशाणी क्र. ०१ वर आदेश</u>**
(दिनांक ०३.०८.२०२६)

अभिलेखाचे अवलोकन केले. फिर्याद ही भा.द.वी. चे कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अधिनियम अन्वये दाखल करण्यात आली. माझे पुर्वअधिकारी यांनी सत्यापन नोंदवली. नि.क्र.१ वर दि.२७.११.२०१८ रोजी आदेश पारीत केला. आरोपींविरुध्द भा.द.वी. ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ आदेशिका निर्गमित केली. आरोपी क्र.१ ते ३ व ६ हे हजर झाले. त्यांनी जामीन अदा केला. त्यानंतर प्रकरण वेळोवेळी तहकुब करण्यात आले.

२. मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन-जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

३. त्यानंतर दि.३०.०७.२०२६ रोजी फिर्यादी हे विधीज्ञांसह हजर झाले. त्यांनी नि.क्र.२४ अन्वये पुरसीस दाखल केली. न्यायालयाने ती पुरसीस फिर्यादीस वाचून दाखविली. त्यांनी ती विधीज्ञांसमक्ष कबुल केली. पुरसीस वर फिर्यादी व विधीज्ञ यांची सही आहे. फिर्यादी यांना खटला आरोपीं विरुध्द पुढे चालविणे नाही. आणि म्हणून त्यांनी पुरसीस दिली आहे.

४. फौजदार प्रक्रिया संहितेचे कलम २५७ अन्वये तक्रार मागे घेतली जाऊ शकते. परंतु, त्यासाठी पुरेसे कारण हवे. फिर्यादी यांचे सदर प्रकरणामध्ये तडजोड झालेली आहे, त्यामुळे त्यांना खटला चालविणे नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. फिर्याद ही नि.क्र.२४ दाखल पुरसीस अन्वये निकाली काढण्यात येते.

२. आरोपी क्र.१ ते ३ व ६ यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

३. आरोपीं क्र.१ ते ३ व ६ यांचे जात मुचलके व जामीन कदबा हे रद्द करण्यात येतात.

४. प्रकरण नस्ती करण्यात यावे.

RAJU BHASKAR DOLE

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.08.03 12:55:08 +0530

(रा.भा. डोळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.४) पैठण

पैठण
दिनांक :०३.०८.२०२६.